# प्रकरण - एक

## प्रास्ताविक

# प्रकरण - १ ले

## प्रा स्ता वि क

१·१ विषय प्रवेश

१·२ संशोधन समस्येचे शब्दांकन

१·३ संशोधन विषयाचे स्वरूप, महत्त्व आणि व्याप्ती

१·४ संशोधनाची उद्दिष्टे

१·५ गृहित गोष्टी

१·६ संशोधनाच्या मर्यादा

१·७ संशोधनाची पद्धती

१·८ प्रकरणीकरण

# प्रकरण - १ ले

## प्रास्ताविक

### १·१ विषय प्रवेश :

आज आपल्या जीवनामध्ये अनेक प्रकारचे संघर्ष आणि कलह निर्माण झालेले आहेत. जीवघेणी स्पर्धा, द्वेषभावना आणि आत्यंतिक लोभ या दुष्टचक्रामध्ये आजचा सर्वसामान्य मनुष्य सापडलेला आहे. भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनलेला आहे. त्यामुळे मानवी जीवन - मुल्येच भ्रष्ट झालेली आहेत. माणसाचा माणसावरचा आणि माणुसकीवरचाच विश्वास उडत चालला आहे. त्यामुळे समाजात प्रसन्नता नाही, शालीनता नाही, परस्परावर विश्वास नाही, समंजस्यपणा नाही असे आपणास सारखे वाटते. समाजमन प्रसंन्न, चैतन्यशील व कार्यमग्न करण्यासाठीच आज शिक्षणातून संस्काराचे आणि संस्कारातून मूल्यांचे महत्व वाढविले पाहिजे[1].

राष्ट्रपिता म.गांधीनी मुल्यशिक्षणाला अतिशय महत्व दिले आहे. ते म्हणतात, " शरीर आणि मनाचा विकास आत्म्याच्या विकासाबरोबरच होत असतो. शिक्षण म्हणजे आत्म्याचे शिक्षण अर्थात हृदयाचे शिक्षण होय. म्हणून मनाचा आत्म्याचा सर्वांगपरिपूर्ण विकास साधावयाचा असेल तर मूल्यशिक्षणाचे मूळ धरले पाहिजे."

आजकाल सेवेला मूल्य प्राप्त होण्याऐवजी किंमत येऊ लागलेली आहे. "किंमत" आणि "मूल्य" यात खूप फरक आहे. उदा. गाईच्या दुधाची किंमत ठरवता येते, पण आईच्या दुधाची किंमत करता येत नाही.

कारण आईच्या दुधाचे मूल्य सर्वश्रेष्ठ असते, ते रुपये - आण्याच्या पैशाने मोजावयाचे नसते. तसेच मानवी जीवनातील सर्व शाश्वत मूल्यांचे आहे.

मूल्यसंक्रमणाच्या अभावामुळे माणसामध्ये निर्माण झालेली विकृती मानवी विनाशालाच कारणीभूत होणार आहे. म्हणूनच मूल्यशिक्षणाला या विज्ञानयुगामध्ये अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेले आहे.

माणूस व इतर प्राणी यांच्यातील मुख्य फरक हाच की, मानवाच्या जीवनाला मूल्यांचा पाया असतो आणि असावा. मानव प्राण्याचे जे मानवात रूपांतर होत असते ते होण्यामध्ये शिक्षणाच्या म्हणजेच त्याच्यामध्ये मूल्यनिर्मिती करण्याच्या प्रयत्नांचा फार मोठा भाग आहे[3]

आज समाजातील विविध सामाजिक संस्थाकडे पाहिल्यास आपल्याला असे दिसून येते की, मानवीमूल्ये पायदळी तुडविली जात आहेत. भौतिक सुखासाठी मनुष्य अवैध मार्गांचा अवलंब करीत आहे. केवळ स्वसुख हाच अशा मानवी प्राण्यांच्या आयुष्याचा पाया असतो. तेच त्यांचे क्षितीज असते. या स्थितीचे वर्णन मराठीतील प्रसिद्ध कवकवियित्री बहिणाबाई चौधरी आपल्या " बहिणाईची गाणी " या काव्य संग्रहातील कवितेमध्ये करते -

" अरे मानसा मानसा कधी व्हशील मानूस ,
अरे मानसाचा झाला कानूस "

माणसातलं माणूसपण सध्या लोप पावत आहे. हे माणूसपण आणायचे असेल, किंवा टिकवायचे असेल, वाल्याचा वाल्मिकी आणि नराचा नारायण करायचा असेल तर मूल्यांचे जतन करणे अपरिहार्य आहे.

मनुष्य विचाराने देव आहे तर शरीराने पशु. साहजिकच तो विचाराने वागला तर त्याची वागणूक देवाप्रमाणे हिताची आहे. या उलट विकाराने वागला तर पशुप्रमाणे घातक ठरते, विचाराचा शरीरावर ताबा ठेवणे हे मनुष्यत्व आहे आणि या माणुसकीचा -हास झाला असल्यानेच आजच्या सर्व समस्या उद्भवल्या आहेत. मग ही माणूसकी कशी उत्पन्न करता येईल ? इमारत, मोटारी, खाणी, कारखाने, बँक बॅलन्स इ. बाह्य वस्तूंच्या कमी जास्त होण्याने माणूसकीत वाढ किंवा घट होते का ? मुळीच नाही. याचा माणुसकीशी काही संबंधच पोचत नाही. मग वर म्हटल्या प्रमाणे विवेकाने देहबुद्धीवर विचाराने विकारावर नियंत्रण ठेवावयास शिकविणे म्हणजेच मनुष्यत्व निर्माण्यासारखे आहे.[१]

रोज कोणतेही वर्तमानपत्र उघडले तरी त्यात दलितांवरील अत्याचार, स्त्रियांशी अमानुष वागणूक, अपंग व वृद्ध ह्यांच्याबद्दल बेफिकीरी, सार्वजनिक मालमत्तेचा विध्वंस, सामुदायिक गुन्हेगारी, भ्रष्टाचार, खून इत्यादी गैरव्यवहारांच्या बातम्या आढळतात. समाजा-मध्ये शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था, शासकीय व अन्य कार्यालये ह्यांच्यामध्ये मानवांचा परस्पराशी होणारा व्यवहार हा अनेकदा सामाजाच्या नैतिक प्रकृतीबद्दल चिंता वाटावी असा असतो. त्यामुळे सर्व क्षेत्रातील विचारवंत नैतिक मूल्यांचा सतत होत असलेला हा -हास पाहून अस्वस्थ व चिंतीत झालेले आहेत.

पूर्वी एकत्र कुटुंब पद्धतीमध्ये आई-बाप, आजी-आजोबा, अन्य नातेवाईक ह्यांच्याकडून गोष्टी, उपदेश यांच्या माध्यमातून कुटुंबातील लहान मुलांवर चांगले संस्कार होत असत. तसेच कुटुंबातील वडीलधाऱ्या व्यक्तींच्या वर्तनातून ते मुलांच्या मनावर ठसत असत. समाजातील आर्थिक परिस्थितीमुळे एकत्र कुटुंबपद्धती नाहीशी झालेली आहे. कुटुंबातील आई व बाप यांना अर्थार्जनासाठी दिवसभर घराबाहेर राहावे लागते. अशा स्थितीत मुलांवर सुसंस्कार करण्याची जबाबदारी आता प्रामुख्याने शिक्षण संस्थावर पडलेली आहे.

सॉक्रेटीसने "Knowledge is virtue" " ज्ञान म्हणजेच सद्गुण " असे म्हटले आहे. याचे प्रत्यंतर आपल्याला प्राचीन काळातील गुरुकूल पद्धतीच्या शिक्षण संस्थेमध्ये पहावयास मिळते. ज्ञानापेक्षा सद्गुणांवर सदाचारावर, नैतिक वागणूकीवर अधिक भर होता, म्हणूनच " शीलं परं भूषणम् " हा वागणूकीचा आदर्श होता, महाभारतामध्ये सुद्धा धर्माप्रमाणे आचरण करणारा शुद्धाचरणी व चारित्र्यसंपन्न माणूस खरा ज्ञानी होय असे म्हटले आहे. या सर्वांवरून " मूल्यांचे संस्कार करून चारित्र्य घडविणे "[४] हे शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट ठरते.

२६ जानेवारी, १९५० मध्ये भारतामध्ये राज्य घटना अंमलात येऊन लोकशाही प्रजातंत्रशासन प्रणालीचा स्वीकार केला गेला आणि भारत हे एक " सेक्युलर राष्ट्र " म्हणून जाहीर करण्यात आले.

भारतामध्ये अनेक धर्म-पंथांचे लोक राहतात. त्यांना कोणत्या धर्मांचे, धार्मिक मूल्यांचे, शिक्षण द्यावयाचे असा प्रश्न निर्माण होतो. प्रत्येक धर्माच्या मूळ तत्त्वज्ञानात फरक नसला तरी धर्म शब्दात त्यांचा प्रेषित, त्यांची भाषा, जीवनातील घटना, धर्माकरिता सांगितलेले कर्मकांड

या सर्वांचा समावेश होतो. यात समानता नाही. प्रत्येक धर्माचे अनुयायी आपलाच धर्म श्रेष्ठ मानू लागलेले होते.

वरील वस्तुस्थितीमुळे भारत हे "सेक्युलर राष्ट्र" म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. "सेक्युलर" याशब्दा करिता धर्मनिरपेक्षता, निधर्मी, धर्मातीतता, सर्वधर्मसमभाव असे विविध शब्द उपयोगात आणले जात आहेत. या शब्दांमुळेच लोकमतात पुष्कळ गोंधळ निर्माण केला आहे. या परिस्थितीचा परिणाम म्हणून भारतीय राज्यघटनेत शासकीय व शासन अनुदानित शिक्षण संस्था मध्ये धार्मिक शिक्षण देण्याबाबत घातलेल्या बंधनामुळे नीतिमूल्यांचे बीजारोपण व संवर्धन करता येईनासे झाले आहेत. धर्म या माध्यमाद्वारे नीतिमूल्ये संवर्धनाचे कार्य, तत्त्वांचे आचरण आज न्याज्य ठरले आहे. या संदर्भात " विद्यापीठ शिक्षण आयोग "(१९४८-४९) नी केलेले विधान महत्वपूर्ण वाटते.

**"........ To be secular does not mean to be religiously illiterate. It is to be deeply spiritud and not narrowly religious."**[5]

धर्म ही संकल्पनाच मुळी समाजात सर्वांनी सर्वांशी आपुलकीने वागावे हे सांगण्यासाठी जन्माला आलेली आहे. म्हणून जो समाज - धारणा करतो तो धर्म असे म्हटले जाते. परंतु हा विचार लोप पावत चालला आहे.

धर्म भावनेतील मूलभूत विचार आणि चारित्र्य संवर्धनाच्या अभावामुळे समाजामध्ये वाढलेल्या विघातक प्रवृत्तींचे दर्शन फक्त सर्व - सामान्य स्तरावरच होते आहे असे नाही. उच्च विद्याविभूषित व्यक्ती व शिक्षित असेल, ज्ञानसंपन्न असेल पण तिच्याकडे शहाणपण असेलच असे

सांगता येत नाही, कांही वेळेला अशिक्षित माणसाना सुशिक्षित माणसापेक्षा अधिक शहाणपण असते, विद्याविभूषित व्यक्तीसुद्धा विविध जीवनमूल्यांना गुंडाळून ठेवून नैतिक मूल्याना परकी झाल्यासारखी दिसतात. ज्यानी समाजाला मार्गदर्शन करावयाचे, ज्यांचा आदर्श इतरांनी घ्यावयाचा असे आदर्श व्यक्तिमत्व समाजात दुर्मिळ होत आहे. त्यांचा परिणाम म्हणून समाजातील सर्वच स्तरावर मूल्यांची हेळसांड झालेली दिसून येते. त्यामुळे सुखी, समृद्ध, संपन्न, जीवनासाठी सुसंस्कारी, चारित्र्यसंपन्न, आदर्श व्यक्तिमत्व निर्माण करून योग्य जीवनमूल्यांची जोपासना करणारी चारित्र्यसंपन्न पिढी निर्माण करणे अगत्याचे आहे.

शिक्षण आयोग (१९६४-६६) या शिक्षण आयोगाने " नैतिक व अध्यात्मिक मूल्यांचा विकास " हे राष्ट्रीय उद्दिष्ट मानले आहे.[६] या दृष्टीने विद्यार्थ्यांत सत्प्रवृत्ती, सद्विचार व सद्भावनाचे प्रवर्तन करणे, नैतिक व अध्यात्मिक मूल्यांचे संस्कार करणे, त्यांचे चारित्र्य घडविणे हे शिक्षणाचे सर्वश्रेष्ठ कार्य म्हणावे लागेल.

वर्तमान स्थितीचे अवलोकन करून आग्रहाने प्रतिपादन करणे आवश्यक आहे की, शिक्षण प्रक्रिया पुनप्रस्थापित केली पाहिजे. तरुण पिढीला जाणीव करून दिली पाहिजे की समाजात असुरक्षितता, हिंसाचार व धाडसी कृत्ये यांना थारा दिला जाता कामा नये. संघटनात्मक समाज सामाजिक, राजकीय व आर्थिक आचरणाच्या नियमांची अंमलबजावणी आणि सक्ती केल्या शिवाय टिकून राहात नाही. भूतकाळातील मागील अनुभवावरून असे अपेक्षित आहे. संलग्न परिणामकारक व जगण्यासारखी मूल्यपद्धती, तर्कशुद्ध शास्त्रीय व नैतिक दृष्टिकोनावर आधारीत असलेल्या शैक्षणिक कार्यक्रमांद्वारे समाजात रोवली जाईल.[७]

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये (१९८६) नागरिकांमध्ये सामाजिक व नैतिक मूल्यांचे संक्रमण राष्ट्र उभारणीसाठी किती आवश्यक आहे याचे प्रतिपादन केलेले आहे.

[८.४] आवश्यक मूल्यांच्या -हासाबाबत वाढती चिंता आणि समाजात वाढत असलेली उपहासवृत्ती लक्षात घेऊन सामाजिक व नैतिक मूल्ये रुजविण्यासाठी शिक्षण हे समर्थ साधन बनावे, यासाठी अभ्यासक्रमाची पुन: नव्याने जुळणी करण्याची गरज निर्माण झाली आहे.

[८.५] सांस्कृतिक दृष्टया बहुविध असणा-या आपल्या समाजात सर्वसामान्य जनतेत ऐक्य व पूर्णत्व येण्यासाठी शिक्षणाने नैतिक व शाश्वत मूल्यांना उत्तेजन दिले पाहिजे. अशा मूल्यशिक्षणाने गूढवाद, धर्मवेड, हिंसा, लोकभ्रम व दैववाद कमी करण्यास मदत केली पाहिजे.

[८.६] अशा या सामना देण्याच्या भूमिकेशिवाय मूल्यशिक्षणात ठाम, निश्चित व गाढ असा आशय आहे. हा आशय आपला वारसा, राष्ट्रीय उद्दिष्टे व सर्वव्यापी ज्ञान यावर आधारित असा आहे. मूल्य शिक्षणाने यावर मुख्यत: भर दिला पाहिजे.[७]

आपण सध्या सामाजिक आणि राजकीय जीवनाच्या अशा टप्प्यातून जात आहोत की, ज्यावेळी दीर्घकालीन स्वीकारलेल्या जीवनमूल्यांचा -हास होत आहे. सर्वधर्मसमभाव, समाजवाद, लोकशाही आणि व्यवसायिक नीतिमूल्ये हया ध्येयावर वाढल्या प्रमाणावर ताण पडतो आहे. असे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणकर्त्यांच्या लक्षात आले आहे. आधुनिक तंत्रज्ञानानी भारावून जाऊन आपल्या नवीन पिढया हया भारताच्या संस्कृतीच्या आणि ऐतिहासिक ठेव्यांच्या मुळापासून अलग

होऊ देता कामा नये. सांस्कृतिक -हास, मानवतावादाचा -हास आणि विलगीकरणाची भावना ही कोणत्याही परिस्थितीत टाळणे अत्यावश्यक आहे. सामाजिक आणि राष्ट्रीय विभक्तपणाच्या शक्ती क्रियाशीलतेने आपल्या लोकशाहीबद्द समाजाची कठीण परीक्षा पाहत आहेत. लोकसंख्या विस्तारामुळे सर्वसामान्य माणसाच्या जीवनाच्या सर्वस्तरांत पसरल्या आहेत.

गुन्हेगारी, हिंसाचार आणि मानवी यातना ह्या जीवनाच्या सर्व स्तरात पसरल्या आहेत. सामाजिक वातावरणातून झिरपलेली पूर्व ग्रहाची भावना आणि गंड मनोविकृती, विशिष्ट कुळात जन्म हाच एक अपघात यामुळे एकात्मतेच्या भावनेच्या वाढीला खीळ बसत आहे. आपले भौतिक वातावरण नद्या, टेकड्या, जंगले, वनस्पती आणि प्राणी जगत हे वाढत्या प्रमाणात प्रदुषित होत आहे आणि कमी सुध्दा होत आहेत. यामुळे जीवनमानाच्या गुणवत्तेला धोका पोहचत आहे. संकुचित जात्यंधपणा, वंशवाद, भाषावाद आणि प्रादेशिक वाद ह्या विचारसरणीमुळे आपल्या लोकांत विभक्तपणाची भावना निर्माण होत आहे. आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विचार विकसित होण्याच्या मार्गात अडसर निर्माण होत आहे. आज जग आकस्मिक विनाशाच्या गर्तेला भेडसावत आहे जी जागतिक अधिक शक्तीच्या वणव्यामुळे निर्माण होऊ शकते. मानवाच्या इतिहासात कधीच न भेडसावणारी शांततेची आणि आंतरराष्ट्रीय जाणीवेची गरज आज भासत आहे. ह्यासाठी शिक्षणामध्ये मूल्यांवर जाणीवपूर्वक भर देणे आवश्यक आहे.[९]

मूल्य संस्काराच्या संदर्भात विविध शिक्षणतज्ञांनी आपले विचार मांडलेले आहेत. या संदर्भात " शिपमन " यांची शिक्षणाची व्याख्या पहाणे

इष्ट ठरेल•

" जेणे करून व्यक्तीच्या वर्तनात बदल घडवून आणून तद्द्वारा एकंदर समाजामध्ये बदल घडवून येईल या हेतूने जाणीवपूर्वक नियंत्रित केलेली प्रक्रिया म्हणजे शिक्षण "

शिक्षणाच्या संदर्भात "कोमीनियस" या शिक्षणतज्ञानेही व थोड्याफार फरकाने वरील विचारच उद्धृत केलेले आहेत• त्याने शाळे संबंधी विचार व्यक्त करताना म्हटले आहे• " खरी शाळा म्हणजे माणुसकीचा कारखाना असतो•"

शिक्षण तज्ञांच्या वरील व्याख्यावरून मूल्यांचेसंवर्धन करण्यासाठी शिक्षण हे कसे प्रभावी साधन आहे हे लक्षात येते•

मातृभाषा मराठीच्या अध्यापनाची अनेक उद्दिष्टे आहेत• त्यामध्ये व्यक्तिमत्वाच्या व्यापक विकासासंबंधी ध्येय, मूल्य व दृष्टिकोन यासंबंधी अनेकांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत• अकोलकर ग•वि• यांनी " मराठीचे अध्यापन " या आपल्या पुस्तकात या संदर्भातच विचार मांडलेले आहेत•[१०]

तसेच प्रा•कुंडले म•वा• यांनीही मातृभाषेच्या उद्दिष्टांचा विचार करतांना " मराठीचे अध्यापन " या आपल्या पुस्तकात " मूल्य संवर्धन ", चारित्र संवर्धन, या संदर्भात विचार मांडले आहेत•[११]

वरील प्रमाणे प्राचार्या पाटील लीला यांनीही आपल्या " मराठीचे अध्यापन व मूल्यमापन " या पुस्तकात व्यक्तिमत्व विकास हा

स्वतंत्र उपविभाग केलेला आहे. यामध्ये त्यांनी मूल्यजोपासना व संस्कार संवर्धनाचे महत्व यासंबंधी आपले विचार मांडले आहेत.[१२]

वरील सर्व मान्यवरांच्या विचारावरून मूल्यांचे रोपण करणे हे मातृभाषेचे प्रमुख उद्दिष्ट आहे हे लक्षात येते. म्हणूनच अभ्यासक्रमात मूल्यसंवर्धनाचे संदर्भात मातृभाषेच्या अध्यापनाला महत्वाचे व स्थान दिले आहे.

मूल्यांचे महत्व लक्षात घेता ती विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित करण्यासाठी मातृभाषा मराठीची पाठ्यपुस्तके माध्यम म्हणून शिक्षकाला कशी वापरता येतील ? मूल्य शिक्षणाचा विचार करून गद्य व पद्य पाठां-मधून उत्तम संस्कार कसे करता येतील ? प्रत्येक पाठामधून कोणती मूल्ये प्रतिबिंबीत झालेली आहेत ? नवी कोणती मूल्ये शोधता येतील ? मूल्य संक्रमणामध्ये कोणत्या अडचणी येतात ? त्या अडचणी दूर करण्यासाठी कोणते उपाय योजता येतील ? विद्यार्थ्यांमध्ये मूल्य संवर्धनासाठी शिक्षकांचे प्रयत्न कोणते आहेत ? त्यामध्ये नव्याने कोणते उपक्रम सुचवता येतील ? यावरून शिफारशी सुचविता येतील हा या शोधप्रबंधाचा प्रयत्न आहे.

मूल्य संक्रमणाच्या संदर्भात भेडसावणारी तीव्र समस्या लक्षात घेता व शिक्षक प्रशिक्षक म्हणून आणि शिक्षणशास्त्राचा एक विद्यार्थी म्हणून मूल्याबाबत संशोधन करावे या हेतूने प्रस्तुत संशोधकाला या विषयामध्ये संशोधन करावे असे वाटते.

१.२ **संशोधन समस्येचे शब्दांकन** :

उपरोक्त परिच्छेदांतील केलेल्या विवेचनातून संशोधन विषयाचे पुढील प्रमाणे शब्दांकन केलेले आहे.

" उच्च प्राथमिक स्तरावरील मराठी ( प्रथम स्तर ) विषयाच्याप पाठ्यपुस्तकांच्या अध्यापनाचा मूल्यशिक्षणाच्या संदर्भात चिकित्सात्मक अभ्यास "

संशोधन हा एक शास्त्रीय अभ्यास आहे. शास्त्रीय अभ्यासात विविध संज्ञा एका विशिष्ट अर्थानेच वापराव्या लागतात. यासाठी वरील संशोधन समस्येच्या विधानात वापरलेल्या संज्ञाच्या पुढील प्रमाणे व्याख्या केलेल्या आहेत.

**उच्च प्राथमिक स्तर** :

या संज्ञेमध्ये इयत्ता ५ ते ७ वर्गांचाच निर्देश अपेक्षित आहे व ज्या शाळांची मातृभाषा मराठी आहे व मराठी माध्यमातून शिक्षण दिले जाते असे इयत्ता ५ ते ७ वी चे वर्ग अपेक्षित आहेत.

**मराठी विषय** :

उच्च प्राथमिक स्तरावर तीन भाषांचा अभ्यास अभ्यासक्रमामध्ये अपेक्षित आहे. त्यावरून महाराष्ट्रामध्ये " मराठी " हा एक भाषिक विषय आहे. महाराष्ट्रामध्ये बहुतांश उच्च प्राथमिक शाळा मराठी माध्यमाच्या असल्याचे मराठी हा विषय शिकविला जातो.

प्रथम स्तर :

मातृभाषेतून शिक्षणाचा पाया घातला जातो. विद्यार्थ्यांच्या मातेची जी भाषा तीला मातृभाषा म्हणतात. ज्या प्रदेशामध्ये बहुतांश लोक जी भाषा बोलतात, ती भाषा शाळेमध्ये प्रथम स्तरावर शिकविली जाते. महाराष्ट्रात प्रथम भाषा म्हणून मातृभाषा " मराठी " शिकविली जाते.

पाठ्यपुस्तक :

"पाठ्यपुस्तक" या शब्दास " क्रमिक पुस्तक " असा पर्यायी शब्द वापरला जातो. इंग्रजी भाषेत पाठ्यपुस्तकास 'Text Book' हा शब्द वापरतात. 'Text Book' चा अर्थ " A book for regular study"[13] असा आहे. " Basic book used in a particular course of study"[14] अशी ही पाठ्यपुस्तकाची व्याख्या केली जाते. याचा अर्थ विशिष्ट अभ्यासक्रमासाठी योजलेले मूलभूत पुस्तक असा होतो. इयत्ता ५ वी ते ७ वी ची मराठी विषयाची पाठ्यपुस्तके " बालभारती " या नावाने महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाने तयार केलेली आहेत या पाठ्यपुस्तकांचा मूल्यशिक्षणाच्या संदर्भात विचार या शोध प्रबंधात अपेक्षित आहे.

मूल्य शिक्षण :

मूल्य शब्दाला इंग्रजी मध्ये 'Value' असा प्रतिशब्द आहे. याचा अर्थ खालील प्रमाणे आहे.

"Belief about what is desirable or undesirable, values reflect the culture of society and if the individual accepts a value for him/herself it may become a goal."[15]

येथे "मूल्यशिक्षण" हा शब्द सुसंस्कार या शब्दाच्या अर्थाशी निगडीत आहे· मानवी संस्कृतीतील सत्‌गुणांनी " मूल्य " ही संज्ञा निर्माण केलेली आहे· येथे समूहजनाचा, समूहजीवनाचा, सामाजिक व्यवहाराच्या आशा आकांक्षेचा विचार व्यक्तीच्या संदर्भात अधिक केला आहे· सामाजिक जीवनात व्यक्तिवर्तन, व्यवहार, जीवन कसे असावे याचे आदर्शीकरण " मूल्य " या संज्ञेमध्ये अपेक्षित आहे·

मानवी जीवनातील काही गोष्टी, काही संबंध, काही विचार याला आपण मोलाचे मानतो· त्यांच्यामुळे आपले जीवन " अर्थपूर्ण " होईल अशी श्रध्दा असते· गोष्टीबद्दलच्या या प्रियत्वामुळे किंवा कल्याणकारिकत्वामुळे त्या त्या गोष्टींना जीवनात "मूल्य" प्राप्त होते· अशा इष्ट, हितकर, वांछनीय म्हणून ठरविलेल्या सद्‌गुणांनाच " मूल्यांचे " स्वरूप प्राप्त होते·

मूल्य म्हणजे काय ? या बाबत विस्तृत विवेचन प्रकरण दोन मध्ये केले असल्याने या ठिकाणी या संज्ञेचा अधिक उहापोह केलेला नाही·

पाठयपुस्तकाचे अध्यापन करताना शिक्षक प्रत्येक पाठांमधून मूल्य संदर्भात कोणते विशिष्ट संस्कार विद्यार्थ्यांमध्ये रूजविण्याचा प्रयत्न करतात ते प्रस्तुत शोधनिबंधात पाहण्याचा प्रयत्न केलेला आहे·

चिकित्सात्मक अभ्यास :

चिकित्सात्मक अभ्यास म्हणजे सूक्ष्म, सांगोपांग व सखोलपणे केलेला अभ्यास होय. यामध्ये अंतर्भेदी निरीक्षण व विश्लेषण अपेक्षित असते. असा अभ्यास की ज्या मध्ये काय आहे ? त्याच बरोबर प्राप्त परिस्थितीत काय केले पाहिजे ? कसे केले पाहिजे ? त्यातून काय साध्य होणार ? याचा घेतलेला शोध.

प्रस्तुत शोधप्रबंधाच्या संदर्भात चिकित्सात्मक अभ्यासामध्ये इयत्ता ५ वी ते ७ वी च्या " बालभारती " मराठी पाठयपुस्तकातील पाठामधून कोणती मूल्ये प्रतिबिंबित होतात ? ती मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये कशी संक्रमण करता येतील ? शिक्षकांची या बाबत कोणती मते आहेत ? मूल्य संक्रमणासाठी शिक्षक कोणते प्रयत्न करतात ? मूल्ये संक्रमित न होण्याची कारणे कोणती ? मूल्यांच्या प्रभावी संक्रमणासाठी योजत असलेले उपाय कोणते ? इत्यादी बाबतचा चिकित्सात्मक अभ्यास अभिप्रेत आहे.

१.३ संशोधन विषयाचे स्वरूप, महत्व आणि व्याप्ती :

प्रस्तुत संशोधन प्रकल्पामध्ये उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या संदर्भात विचार केलेला आहे. या स्तरावर ख-या अर्थाने जाणीवपूर्वक औपचारिक शिक्षणाची सुरवात होते. या स्तरामध्ये ९ ते १२ वयोगटाची मुले येतात. मानसशास्त्रीयदृष्टया हे वय संस्कारक्षम असते. संवेदनाशील असते. त्यामुळे त्यांच्या मनावर जे जाणीवपूर्वक संस्कार केले जातील त्यातूनच त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होतो.

याच वयात भावी आयुष्यातील मोठेपणाचे बीजारोपण तयार केले जाते.

या वयोगटातील बालक किशोरावस्थेमध्ये असतो. सत्प्रवृत्ती यावेळी त्याच्यामध्ये प्रबळ दिसून येते. कुटुंबाचा, समाजाचा, शाळेतील वातावरणाचा त्यांच्यावर परिणाम होतो. अशा विद्यार्थ्यांना नेतृत्व, सद्भावना जोपासण्यासाठी शिक्षकाने जागृकता दाखवून मूल्यांचे संस्कार जाणीवपूर्वक करणे आवश्यक असते.

तसेच हाच त्याच्या भावी शिक्षणाचा, त्याच्या व्यक्तिमत्व विकासाचा पाया असल्यामुळे आणि शिक्षणातून व्यक्तीचा सर्वांगीण विकास अपेक्षित असल्याने त्याच्या व्यक्तिमत्त्वाची योग्य, सुसंस्कृत अशी जडणघडण करून त्याचे जीवन संस्कारसमृध्द झाले तरच जीवनास योग्य अर्थ प्राप्त होऊ शकेल.

भारताला स्वातंत्र्य मिळून सेहेचाळीस वर्षे झालीत. भारतातील लोकांच्या मानसिक, आर्थिक, सामाजिक परिस्थितीकडे पाहिले की, प्रत्येक ठिकाणी संस्कृतिपोषक मूल्यांचा होत असलेला -हास पहावयास मिळतो. स्वतःची कर्तव्यदक्षता विसरून स्वार्थासाठी भ्रष्टाचारी बनलेली पिढीही आपण पहात आहोत. चिरंतन सत्याला सामोरी जाण्यासाठी आवश्यक असणारी निर्भयता क्वचित एखाद्याकडे पाहावयास मिळते. त्यामुळे सर्वत्र अपप्रवृत्तीचे साम्राज्य पहावयास मिळते आहे. त्यामुळे सामाजिक, राष्ट्रीय स्वास्थ्याला कधी नव्हे ते ग्रहण लागलेले आहे. जीवनात येत असलेले यश-अपयश हे खिलाडूवृत्तीने झेलले पाहिजे, पचविले पाहिजे, पण प्रत्यक्षात यशाने हुरळून जाऊन यशाच्या धुंदीमध्ये " स्व "चा

नाश करणारी आणि अपयशाने क्रोधित होऊन इतरांचा नाश करणारी पिढी तयार होत असल्याचे आपणास पहावयास मिळते. लोकांच्या जीवनाला बेशिस्तीचे ग्रहण लागलेले दिसत आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनाला सामोरे न जाता स्वार्थासाठी आंधळ्या धर्माची कास धरणारे व माणुसकी हरवलेले अनेकजण आपणास पहावयास मिळतात.

राष्ट्रप्रेमाची संकल्पना मुळातूनच भारतीयामध्ये रुजविली पाहिजे हे पंजाब प्रश्न, सीमावाद, जातीय दंगली, धर्मवेडेपणा यासारख्या गोष्टींनी सिद्ध केल्याचे दिसत आहे. करुणा, सहकार्य बंधुता, समता, आदरभाव, राष्ट्रीय एकात्मता, निसर्गप्रेम यासारखी मूल्ये भारतीयांमध्ये रुजविण्याची गरज आज असल्याचे आपणास पहावयास मिळते आहे. ही परिस्थिती सावरण्यासाठी लोकांच्यामध्ये मूल्यसंवर्धन व संक्रमण विशिष्ट नियोजनाद्वारे झाले पाहिजे अशी संशोधकाची भूमिका निश्चित झाली आहे. शिक्षणाची व्याख्या, "व्यक्तिमध्ये इष्ट दिशेने बदल घडवून आणणारी प्रक्रिया " अशी केली जाते. म्हणून मूल्य संवर्धन व संक्रमण शिक्षणानेच शक्य आहे या विचाराप्रत संशोधक आला.

शिक्षणाद्वारे व्यक्तिमत्त्व घडविण्याचे कार्य केले जावे अशी अपेक्षा आहे. " व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास म्हणजे शिक्षण " अशी शिक्षणाची व्याख्या केली जाते. या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू आहेत. तसेच आयुष्यात घडणाऱ्या प्रत्येक घटना-प्रसंगातून मुलांवर संस्कार होत असतात. त्यामुळे येणाऱ्या अनुभवातील चांगल्या-वाईटाची निवड त्यास करता आली पाहिजे. यासाठी व्यक्तीची निश्चित भूमिका असेल तरच तो या योग्यायोग्य अनुभवांची पारख करू शकेल. यासाठी किशोरवयात केले जाणारे संस्कार हे व्यक्तीची चिरकाल टिकणारी स्वभाव गुणवैशिष्ट्ये

निश्चित करणारे असतात. म्हणून संशोधकाने संशोधनासाठी संस्कारक्षम अशा उच्च प्राथमिक स्तर निवडलेला आहे.

किशोर वयोगटातील मुलांची वैशिष्टये -

सर्वसाधारणपणे अशी सांगता येतील -

अ) किशोर वयोगटातील विद्यार्थी नवीन नवीन गोष्टी स्वत:च करण्याचा प्रयत्न करतात.

ब) परिकथांचे आकर्षण कमी होवून प्रवासवर्णन, निसर्गवर्णन, ऐतिहासिक गोष्टी त्याला आवडू लागतात.

क) एखादे कौशल्य घेण्यासाठी परिश्रम करण्याची तयारी असते.

ड) निरनिराळ्या घटनांमधील अर्थ समजून घेण्याचा त्याचा प्रयत्न चालू असतो.

इ) या वयोगटातील विद्यार्थी संघप्रवृत्तीने वावरतात. गटात जास्त वेळ घालवतो.

फ) या गटातून नीतीबद्दलच्या कल्पना विकसित होतात.

ब) आई-वडीलांच्या प्रेमाबद्दल तो अतिशय संवेदनशील बनतो.

भ) या वयामध्ये किशोर आपल्या भावनांना कलण लावतो.

म) या वयात कारणशक्तीचा विकास झाल्याने मुले धडपडी असतात.

प) या किशोरावस्थेतील मुलांना शिक्षकाबद्दल अतिशय आदर असतो.

मूल्य विचाराच्या संदर्भात किशोरावस्थेतील गटाची निवड संशोधकाने का केली हे समजून येईल. मूल्यविचार ही अमूर्त संकल्पना

असल्याने मातृभाषेच्या अभ्यासक्रमातून संक्रमित होणाऱ्या मूल्यांचा शोध घेता येईल. अधिकाधिक सद्गुणांशी (मूल्यांनी) युक्त असे पाठ अभ्यासक्रमात घातल्याने या वयोगटाची निवड केली.

शिक्षणानेच मूल्य संवर्धन, संक्रमण शक्य आहे. याची निश्चिती झाल्यानंतर संशोधकाने मातृभाषेच्या क्रमिक पुस्तकांच्या अध्यापनाचाच मूल्यविचारांच्या संदर्भात विचार केला आहे.

> " व्यक्तिमत्वाच्या वेलीवर उमलणाऱ्या सुंदर सुमनांना मातृभाषा हाच जीवनरस आहे." १६

" मराठी " मातृभाषेने महाराष्ट्रीय माणसाचे मन घडविले आहे. त्याच्या मनाच्या प्रत्येक पैलूवर मातृभाषेचे ऋण आहे. मातृभाषा ही संस्कृती संवर्धक असते. व्यक्तीच्या आंतरिक क्रिया-प्रतिक्रियांना मातृभाषाच एक विशिष्ट वळण देत असते. "मूल्यसंस्कार" या संकल्पनेचा संबंध व्यक्तिमत्वातील स्थिरभावाशी असतो. त्यामुळे अमूर्त असणारी " मूल्यविचार " ही संकल्पना विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वात संस्कारित करून स्थिरभावाशी जवळ नेणे महत्वाचे असते.

व्यक्ती आपल्या विविध भावना मातृभाषेद्वाराच व्यक्त करते. म्हणूनच कोलरिज म्हणतो की,

"माणसा माणसातील हृदयसंवाद हा मातृभाषेतूनच चालतो. म्हणून मातृभाषेद्वारा व्यक्तीवर केले जाणारे संस्कार अधिक प्रभावी, परिणामकारक व दृढ होतात.

वर्तमानकालीन मूल्यांची ही अधोगती एक विघातक घटना आहे. यासाठी भूतकालातील मागील अनुभवावरून असे अपेक्षित आहे की, संलग्न परिणामकारक व जगण्यासारखी मूल्यपद्धती तर्कशुद्ध, शास्त्रीय व नैतिक दृष्टीकोनावर आधारित असलेल्या शैक्षणिक कार्यक्रमाद्वारेच समाजामध्ये रोकली जाईल. मूल्यांचा सर्वस्तरावरील होत असलेला -हास ही चिंतेची बाब झाली आहे. यातूनच आज भावी पिढीवर नैतिक मूल्यांचा संस्कार होण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे.

आजची शिक्षणपद्धती ही दिवसेंदिवस मूल्यसंवर्धनाचे व जोपासनेचे संदर्भात अपयशी होत आहे. त्यामुळे विचारवंत अस्वस्थ झालेले आहेत. शिक्षणातील विश्वासार्हता कमी होत चालली आहे. ही [illegible] अस्वस्थता घालवून शैक्षणिक कार्याची घडी मूल्यसंवर्धनाचे संदर्भात योग्य करावयाची असेल तर इयत्ता ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांवर मातृभाषेतून जाणीवपूर्वक मूल्यसंस्कार करणे अगत्याचे आहे.

संशोधन विषयाचे महत्व खालील प्रमाणे सांगता येईल. या संशोधनाचे निष्कर्ष व त्यावर आधारित शिफारशी मूल्यशिक्षणा संदर्भातील प्रचलित परिस्थितीतील समस्यांच्या निराकरणासाठी उपयुक्त ठरतील असा विश्वास वाटतो.

जे.पी.नाईक यांनी म्हटले आहे,

Education is essentially a three-fold process, imparting information, teaching of skills and

cultivation of values. In the present educational system, the emphasis is almost exclusively on the first of these objectives, the imparting of information. The second objective, vis. the teaching of skills is partially attempted and the production skills are almost to tally neglected. But the most important reform relates to the third objective which has been neglected in the past, viz. the cultivation of values. Let us realise that no education can be really value neutral and that if we do not cultivate the right value, the wrong ones will eventually emerge and dominate the scene. We must therefore, now lay the highest emphasis in our educational system on the cultivation of the values appropriate to the modern democratic and socialist society."[17]

जे•पी•नाईक यांच्या विचारातून हे स्पष्ट होते की, मूल्यशिक्षणाल मानवी जीवनात महत्वाचे स्थान आहे• परंतु आपल्या शिक्षणपद्धतीमध्ये आजपर्यंत मूल्यशिक्षणाकडे दुर्लक्ष केले गेले आहे• दुर्लक्षित अशा मूल्यशिक्षणाकडे अध्यापक, पालक, समाज, शैक्षणिक संस्था, शिक्षण खाते यांचे लक्ष वेधण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन उपयुक्त होईल असे वाटते•

राष्ट्र म्हणजे राष्ट्रातील माणसे होत. माणसे घडवून आपल्याला राष्ट्र घडवायचे असते. कोणतेही राष्ट्र मूल्यांचा पाठपुरावा केल्याशिवाय विश्वामध्ये खंबीरपणे उभे राहू शकत नाही. "क्रियाशीलता" या मूल्याच्या पाठपुराव्यामुळेच अमेरिका, जपान, जर्मनी, रशिया आज जगामध्ये ताठ मानेने जगताहेत. मूल्यांच्या पाठपुरावा हा राष्ट्र उभारणीसाठी अत्यावश्यक असतो. याची जाणीव जागृती समाजामध्ये घडविण्याच्या दृष्टीने ही प्रस्तुत संशोधन उपयुक्त होईल याची खात्री वाटते.

मूल्य संक्रमणातील अडचणी नाहीशा करण्यासाठी अध्यापकांनी मराठीच्या पाठ्यपुस्तकाच्या अध्ययन, अध्यापनाबाबतीत कोणती सुधारणा केली पाहिजे या संदर्भात प्रस्तुत संशोधनावरील निष्कर्ष व शिफारशी उपयुक्त होतील.

" मूल्य " ही संकल्पना व्यापक आहे. परंतु सर्वच मूल्य संक्रमणाचा विचार येथे अभिप्रेत धरलेला नाही. केवळ इयत्ता ५ वी ते ७ वीच्या मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकातील पाठामधून प्रतिबिंबित होणा-या मूल्यांच्या संक्रमणाचाच विचार येथे केलेला आहे. त्यासाठी मराठी विषयाच्या अध्ययन- अध्यापनापुरताच हा अभ्यास मर्यादित आहे.

## १.४ संशोधनाची उद्दिष्टे :

उपरोक्त विषयाच्या संशोधनाची उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत.

१) इयत्ता ५ वी ते ७ वी च्या उच्च स्तरावरील मातृभाषा मराठीच्या पाठ्यपुस्तकांतील पाठांमधून व्यक्त होणा-या मूल्यांचा शोध घेणे.

२) पाठयपुस्तकांतील मूल्ये विद्यार्थ्यांत संक्रमित होतात काय याचा शोध घेणे.

३) ही मूल्ये संक्रमित करण्यासाठी संबंधित शिक्षकांनी केलेल्या प्रयत्नांचा शोध घेणे.

४) ही मूल्ये विद्यार्थ्यांत किती प्रमाणात संक्रमित होतात याचा शोध घेणे.

५) ही मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित होत नसतील तर त्यामागील कारणांचा शोध घेणे.

६) ही मूल्ये अधिक चांगल्याप्रकारे संक्रमित होण्यासाठी उपाययोजना सुचविणे आणि शिफारशी करणे.

१.५ गृहित गोष्टी :

१) मूल्यांना मानवी जीवनामध्ये असाधारण महत्व आहे.

२) मानवाचे मानवपण ही मूल्यांमुळे मिळालेली गोष्ट आहे.

३) मातृभाषेचे शिक्षण हे मूल्यसंस्काराचे महत्वाचे साधन आहे.

४) मूल्य संस्कार हे मातृभाषेच्या अध्यापनाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

५) किशोरावस्था ही मूल्य संक्रमणासाठी योग्य अवस्था आहे.

१.६ संशोधनाच्या मर्यादा :

या संशोधनाच्या मर्यादा खालील प्रमाणे सांगता येतील.

१) हे संशोधन इयत्ता ५ वी ते ७ वी च्या प्रथम भाषा मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकांच्या अध्यापनापुरतेच मर्यादित आहेत, सबब हे संशोधन मराठी माध्यमाच्या शाळापुरतेच मर्यादित आहे.

२) हे संशोधन कोल्हापूर शहरातील उच्च प्राथमिक शाळापुरतेच मर्यादित आहे.

१.७ <u>संशोधनाची कार्यपध्दती</u> :

हे संशोधन वर्तमान परिस्थितीशी निगडीत असल्याने सर्वेक्षणात्मक पध्दतीचा वापर केलेला आहे. या समस्येच्या संदर्भात सद्य:स्थिती कोणती आहे ? हे जाणून घेण्यासाठी ही संशोधन पध्दती उपयोगी आहे. या पध्दतीच्या आधारे मिळालेल्या व पाठ्यपुस्तकांचे परीक्षण, विश्लेषणाच्या मिळालेल्या माहितीचे संकलन, वर्णन व स्पष्टीकरण करून त्यानुषंगाने मूल्यशिक्षणासाठी अपेक्षित असणा-या बदलांसाठी योग्य त्या शिफारशी केलेल्या आहेत.

प्रस्तुत संशोधनाचे खालील प्रमाणे तीन भाग पडतात.

१) इयत्ता ५ वी ते ७ वी च्या मराठी " बालभारतीच्या " पाठ्यपुस्तकातील पाठामधून प्रतिबिंबित होणा-या मूल्यांचा शोध घेणे.

२) पाठ्यपुस्तकामधून मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित होतात. काय, जर होत असतील तर शिक्षक कोणते प्रयत्न करतात याचा अभ्यास करून ती किती प्रमाणात संक्रमित होतात याचा आढावा घेणे.

३) तिस-या विभागामध्ये मूल्यसंक्रमणातील अडचणींचे निराकरण करून

निष्कर्ष काढणे व शिफारशी करणे.

संशोधनासाठी आवश्यक माहिती संकलित करण्यासाठी प्रश्नावलीचा वापर करण्यात आलेला आहे. ही प्रश्नावली कोल्हापूर शहरातील महानगरपालिका क्षेत्रातील उच्च प्राथमिक शाळांतील इयत्ता ५ वी ते ७ वी च्या वर्गांना मराठी विषयाचे अध्यापन करणा-या अध्यापकांना देण्यात आली. सदरच्या अध्यापकांना जी प्रश्नावली दिलेली होती ती प्रश्नावली ( परिशिष्ट "अ" ) मध्ये दिलेली आहे.

इयत्ता ५ वी ते ७ वी च्या मराठी विषयाच्या पाठ्य-पुस्तकांतील गद्य व पद्य पाठांमधून कोणकोणती मूल्ये प्रतिबिंबित झालेली आहेत याचा संशोधकांनी शोध घेतला, प्रत्यक्ष अध्यापन करणा-या शिक्षकांना प्रत्येक पाठातील नवीन मूल्ये शोधण्यास सांगितली होती व त्याप्रमाणे शिक्षकांनी नवीन मूल्ये सुचविली आहेत.

संशोधनासाठी वापरात आणलेली प्रश्नावली मूल्यशिक्षण, मूल्य संक्रमण, मूल्यसंवर्धन व इयत्ता ५ वी ते ७ वी च्या मराठीच्या पाठ्य - पुस्तकातील पाठांमधून प्रतित होणा-या मूल्यांच्या रुजवण्याच्या संदर्भात अध्यापक कोणकोणते प्रयत्न करतात, त्यामध्ये कोणकोणत्या अडचणी येतात. यावर आधारित आहे, तसेच या प्रश्नावलीच्या आधारे मातृभाषेची पाठ्यपुस्तके, त्यामध्ये प्रतिबिंबित होणारी मूल्ये, मूल्य शिक्षण यांच्या संदर्भात अध्यापकांचे मनोगत, त्यांची मते, विचार व अपेक्षा यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

या प्रश्नावलीत एकूण १० प्रश्न होते. त्यातील कांही प्रश्न बंदिस्त स्वरूपाचे तर कांही मुक्त स्वरूपाचे तर कांही प्रश्न संमिश्र स्वरूपाचे

होते. संबंधित अध्यापकांना दिलेल्या प्रश्नावलीचे विश्लेषण पुढील सारणीमध्ये केलेले आहे.

सारणी क्रमांक १.१

प्रस्तुत संशोधनासाठी इयत्ता ५ वी ते ७ वी च्या मराठी विषय शिकविणा-या अध्यापकांनी भरून द्यावयाच्या प्रश्नावलीचे विश्लेषण

| प्रश्न क्रमांक | प्रश्नाचे स्वरूप | प्रश्नाचा उद्देश |
|---|---|---|
| १ते ६ | बंदिस्त | अध्यापकांची सर्वसाधारण माहिती त्यांच्याशी पुन्हा संपर्क साधता यावा यासाठी विचारलेली आहे. |
| ७ | बंदिस्त | पाठयपुस्तकातील पाठामधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये जाणीवपूर्वक संक्रमित केली जातात काय ? |
| ८ | मुक्त | जात असल्यास कशा प्रकारे ? |
| ९ | संमिश्र | ती संक्रमित केली जात नसल्यास त्यामागील कारणे कोणती हे जाणून घेणे. |
| १० | बंदिस्त | मूल्य संक्रमणाचे प्रमाण जाणून घेणे आणि |
| ११ | मुक्त | मूल्य संक्रमणातील अडचणी जाणून घेणे. |
| १२ | मुक्त | मूल्य संक्रमणातील अडचणीवर कशा प्रकारे मात करता येईल ? |

सारणी क्रमांक १०१ पुढे चालू ....

| प्रश्न क्रमांक | प्रश्नाचे स्वरूप | प्रश्नाचा उद्देश |
|---|---|---|
| १३ | मुक्त | मूल्ये चांगल्या त-हेने संक्रमित करण्या संबंधी उपाय ■ जाणून घेणे. |
| १४ | बंदिस्त | मूल्याबाबत शिक्षकांना हस्तपुस्तिका आवश्यक आहे काय ? |
| १५ | बंदिस्त | पाठयपुस्तकातील मूल्ये संक्रमित करण्यासाठी अभ्यास पुरक कार्यक्रम योजता काय ? |
| १६ | मुक्त | योजत असलेले उपक्रम व कोणत्या उपक्रमातून कोणती मूल्ये बिंबवू इच्छिता ? याशिवाय |
| १७ | मुक्त | आणखी कोणते उपक्रम योजता येतील ? |
| १८ | बंदिस्त | मूल्य शिक्षणाच्या संदर्भात एखाद्या कृतिसत्रास |
| १९ | बंदिस्त | किंवा शिबिरास उपस्थित राहिला आहात काय? |
| २० | बंदिस्त | कृतिसत्राचे नाव/कृतिसत्र कोणी आयोजित केले होते? |
| २१ | बंदिस्त | कृतिसत्राचा कालावधी किती ? |
| २२ | बंदिस्त | कृतिसत्रात कोणते प्रशिक्षण देण्यात आले ? |
| २३. | संमिश्र | कृतिसत्र / शिबिर परिणामकारक होण्यासाठी कोणत्या सूचना करू शकाल ? |
| २४ | बंदीस्त | मूल्ये आणि परीक्षा यांचा संबंध जोडावा का ? |
| २५. | बंदिस्त | तो संबंध कसा जोडता येईल. |

सारणी क्रमांक १.१ पुढे चालू ....

| प्रश्न क्रमांक | प्रश्नाचे स्वरूप | प्रश्नाचा उद्देश |
|---|---|---|
| २६ | बंदिस्त | मूल्ये संक्रमित झाली आहेत की नाही याचे मूल्यमापन करावे काय ? |
| २७ | मुक्त | मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन करता येत नसल्यास त्याची कारणे कोणती ? |
| २८ | बंदिस्त | मूल्ये किती प्रमाणात रूजली हे प्रमाण समजेल काय ? |
| २९ | मुक्त | मूल्ये किती प्रमाणात रूजली याचे मूल्यमापन कसे करावे. |
| ३० | मुक्त | प्रस्तुत संशोधनास उपयुक्त माहिती जाणून घेणे. |

प्रश्नावलीद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व वर्गीकरण करून, वर्गीकरणाच्या योग्य मांडणीतून वस्तुस्थितीची स्पष्ट कल्पना आणलेली आहे. वस्तुस्थितीचा साकल्याने विचार करून पाठयपुस्तकांच्या अध्यापनातून मूल्यसंवर्धन या संदर्भात वस्तुस्थितीचे स्वरूप लक्षात घेतले गेले आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे निष्कर्ष काढले गेलेले आहेत. या निष्कर्षांचा संघटीतरित्या सूत्रबद्द विचार करून समस्येच्या संदर्भात कोणती उपाययोजना करता येईल यासाठी शिफारशी करण्यात आलेल्या आहेत.

प्रश्नावली द्वारा मिळालेली माहिती पडताळण्यासाठी तिची यथार्थता व विश्वसनीयता आजमावण्यासाठी संशोधकाने उच्च प्राथमिक

स्तरावर मराठी विषय शिकविणा-या पंधरा (१५) शिक्षकांच्या अनौपचारिक मुलाखती घेतल्या आहेत. (पहा परिशिष्ट "क" )

तसेच इयत्ता ५ वी ते ७ वी च्या मराठीच्या १० पाठांचे निरीक्षण केले. सदरचे निरीक्षण व घेतलेल्या मुलाखती, पाठाचा आशय, पाठांतून प्रतिबिंबित होणारी मूल्ये आणि ती मूल्ये विद्यार्थ्यांत संक्रमित होण्यासाठी शिक्षकांनी केलेले प्रयत्न या मुद्यांच्या संदर्भात आहेत. (पहा परिशिष्ट "ड")

१.८ <u>प्रकरणीकरण</u> :

संशोधनामध्ये वापरलेली पद्धती तसेच प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या सामग्रीचे वर्गीकरण व पृथ:करण करुन त्यांचे अन्वयार्थ लावून व त्या अनुरोधाने काढलेले निष्कर्ष, शिफारशी पुढील प्रकरणामधून मांडलेल्या आहेत.

<u>प्रकरण - १</u> : " विषय प्रवेश "

प्रस्तुत प्रकरणात मूल्याची समस्या कशी निर्माण झाली याचा शोध घेवून समस्येचे शब्दांकन केलेले आहे. तसेच समस्येचे महत्व, गरज, समस्येच्या मर्यादा, उद्दिष्टे, गृहितगोष्टी आणि या समस्येसाठी कोणती संशोधन पद्धती उपयोगात आणली, संशोधनाची मांडणी किती व कोणत्या प्रकरणात केली आहे याचा निर्देश करण्यात आलेला आहे.

प्रकरण – २ : " मूल्य आणि शिक्षण यांचा परस्पर संबंध "

प्रस्तुत प्रकरणात मूल्य म्हणजे काय ? त्याचे मानवी जीवनातील स्थान, मूल्ये रूजवावयाचीत, बिंबवावयाचीत म्हणजे काय करावयाचे ? मूल्य रूजवण्यासंबंधी शिक्षकाची भूमिका कोणती ? अध्यापनातून मूल्ये रूजवायची म्हणजे अध्यापन पद्दती कशी असावी इत्यादी गोष्टींचा उहापोह करण्यात आलेला आहे.

प्रकरण – ३ : " संशोधन समस्येशी निगडित साहित्याचे समालोचन "

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधनासाठी निवडलेल्या विषयाशी निगडित ग्रंथ, साहित्य, लेख व मासिकांचे व संशोधन साहित्याचे समालोचन केलेले आहे.

प्रकरण – ४ : " मातृभाषा मराठीच्या पाठयपुस्तकांचे मूल्यांच्या दृष्टिकोनातून केलेले विश्लेषण "

या प्रकरणात इयत्ता ५ वी ते ७ वी च्या मराठी विषयाच्या पाठयपुस्तकातील पाठांमधून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांचा शोध घेऊन ती निश्चित करण्यात आलेली आहेत. तसेच त्यांचे विश्लेषण करण्यात आलेले आहे.

प्रकरण – ५ : " संशोधन सामग्रीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन "

या प्रकरणामध्ये प्रश्नावलीद्वारे गोळा केलेल्या माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण करून या विश्लेषणावर आधारित अन्वयार्थ लावण्यात आलेला आहे.

प्रकरण - ६ : " निष्कर्ष आणि शिफारशी "

संशोधन सामग्रीच्या आधारे समस्येच्या वस्तुस्थितीचे निश्चिती करण करण्यात आलेले आहे. त्यातून निष्कर्ष काढलेले आहेत. काढलेल्या निष्कर्षांच्या आधारे शिफारशींचा निर्देश करण्यात आलेला आहे व निश्चित अशी उपाययोजना सुचविण्यात आलेली आहे. तसेच प्रस्तुत संशोधन विषयाशी प्रत्यक्षपणे निगडित नसलेल्या तथापि प्रस्तुत समस्येचे सम्यक आकलन होण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरणाऱ्या काही समस्यांचा पुढील संशोधनासाठी निर्देश करण्यात आलेला आहे.

=0=0=0=0=0=

## संदर्भ :


१. हेरवाडे श्रीधर : "शिक्षण भारती"
मूल्य शिक्षण विशेषांक जानेवारी, १९९२
पृष्ठ - १०, ११

२. पाटील लीला : " मूल्य शिक्षण "
कोल्हापूर - श्री.म.ता.अध्यापक महाविद्यालय
सुवर्ण महोत्सव समिती, १९८४-८५

३. जोशी अरविंद सदाशिव : "भारतातील नैतिक व अध्यात्मिक शिक्षण आवश्यकता आणि दिशा "
बुलढाणा - चैतन्य प्रकाशन, जानेवारी, १९७१
पृष्ठ - १४

४. कुंडले म.बा. : "शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र"
पाचवी आवृत्ती १९८१.
पुणे - श्री विद्या प्रकाशन, पृष्ठ - ५१.

५. Radhakrishnan : (Chairman) University Education commission Report, 1948.49, Volume I Simla-Government of India press, August 1949, p.300.

६• डॉ•कोठारी डी•एस्•: "शिक्षण आयोग अहवाल"
(शिक्षण आणि राष्ट्रीय विकास)
१९६४-६६ (नवी दिल्ली- शिक्षण मंत्रालय, भारत सरकार) पृष्ठ - ११

७• राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६, शैक्षणिक आव्हानाकडून कृती कार्यक्रमाकडे, पुणे - संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद) पृष्ठ - १०, १४४

८• कुंडले म•बा• : शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, पाचवी आवृत्ती, १९८१• पुणे - श्री विद्या प्रकाशन पृष्ठ - ५०९, ५१०•

९• शिक्षक मार्गदर्शक व्यापक कार्यक्रम - पुणे - संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, १९८८ पृष्ठ - ५४

१०• अकोलकर ग•वि•व पाटणकर ना•वि• : मराठीचे अध्यापन सातवी आवृत्ती पुणे - व्हीनस प्रकाशन, १९७० पृष्ठ-५०

११• कुंडले म•बा : मराठीचे अध्यापन, द्वितीय आवृत्ती, १९८५ पुणे-श्री विद्या प्रकाशन - पृष्ठ ५६

१२• पाटील लीला : मराठीचे अध्यापन व मूल्यमापन, १९७८ पुणे - व्हीनस प्रकाशन पृष्ठ - १२, १३

१३. G.Terry page and Thomas J. B. with marshall A.R. :- Inter National Dictionary of Education, Reprint. (London : Kegan page Ltd., 1978 p.342

१४. Sykes J. B. :- The concise Oxford Dictionary of current English, Seventh Edition. (Bombay - Oxford University press 1987.) p. 1107

१५. G. Terry page and Thomas J. B. with Marshall A.R. :- International Dictionary of Education reprint. (London, Kogan page Ltd., 1979 ) p. 357.

१६. ग.वि.अकोलकर, : मराठीचे अध्यापन, सातवी आवृत्ती
ना.वि.पाटणकर (पुणे : व्हिनस प्रकाशन) पृष्ठ ४, १९७०

१७. J.P.Naik : Policy and Performance in Indian Education 1944.74 as Quoted in


=0=0=0=0=0=